# श्री महालक्ष्मी को-ऑप. बँक लि. कोल्हापूर

**प्रधान कार्यालय:** १६७, बी, श्री भवन, मंगळवार पेठ, कोल्हापूर.
दूरध्वनी क्र.: ०२३१ - २५४१०५१ / २५४३८३७ / २५४५५५२.

## विक्रीची जाहीर नोटीस ( निविदाद्वारे )

**दि सिक्युराटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (२००२ चा ५४ ) कलम १३(१२) व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या रुल ८ व ९ प्रमाणे.**

**श्री महालक्ष्मी को-ऑप. बँक लि., कोल्हापूर** १६७, बी, श्री भवन, मंगळवार पेठ, कोल्हापूर यांनी **खाली नमूद कर्जदार** यांना खाली नमूद केलेल्या मिळकतीच्या तारणावर कर्ज पुरवठा केलेला असून सदर कर्ज हे एन.पी.ए. झालेले असल्याने बँकेने दि सिक्युराटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ कलम १३(२) प्रमाणे मागणी नोटीस कर्जदार व जामिनदार यांना दि. **१३/०३/२०२४** रोजी दिली होती व त्या नोटीसीप्रमाणे रक्कम न भरल्याने बँकेने याच कायद्याच्या कलम १३(४) प्रमाणे **ता. २१/०५/२०२४** रोजीची ताबा नोटीस दिली होती व त्याप्रमाणे कर्जास तारण असलेल्या खाली नमूद मिळकतीचा **प्रत्यक्ष ताबा ता. ०६/०६/२०२४** रोजी घेणेत आला होता. आता, सदर कायद्याच्या कलम १३(१२) व सिक्युरिटी इंटरेस्ट ( एन्फोर्समेंट ) रुलसच्या रूल ८ व ९ प्रमाणे खाली नमूद केलेल्या तारण मिळकती विक्री करणेबाबत लखोटाबंद निविदा मागविणेत येत असून सदर **मिळकत** ही **'जशी आहेत तशी व आहे त्या परिस्थितीत'** या तत्त्वावर विकणेत येणार आहे. सदर मिळकत ज्यांना खरेदी करणेची इच्छा आहे त्यांनी लखोटाबंद निविदा खालील नमूद अधिकृत अधिकारी **श्री महालक्ष्मी को-ऑप बँक लि., कोल्हापूर** येथे **रु. ५,९०,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख नव्वद हजार फक्त)** इतक्या इसारा रकमेसह डिमांड ड्राफ्ट / पे ऑर्डर / ऑनलाईन ट्रान्सफर पद्धतीने **श्री महालक्ष्मी को-ऑप बँक लि., कोल्हापूर** यांचे नांवे बँकेच्या **मुख्य कार्यालयात शुक्रवार, दि. १४/११/२०२५** पर्यंत पाठविणे आवश्यक आहे. सदर निविदा **शनिवार, ता. १५/११/२०२५** रोजी, **दुपारी १२.०० वाजता श्री महालक्ष्मी को-ऑप बँक लि., कोल्हापूर या बँकेच्या मुख्य कार्यालय, कोल्हापूर येथे उघडण्यात येतील.** सदर कर्ज प्रकरणासंबंधीत बँकेकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे पडताळणी करीता कार्यालयीन वेळेत **बँकेच्या ताराबाई पार्क, कोल्हापूर शाखेत** उपलब्ध असतील. **सदरची नोटीस ही www.smcbl.in या बँकेच्या वेबसाईटवर पहावयास मिळेल.**

| कर्जदार व जामिनदार यांची नावे व पत्ता | दि. ३०.०९.२०२५ अखेर येणेबाकी रक्कम |
|---|---|
| १) **श्री. शरद सयाजीराव जाधव (कर्जदार)**<br>**रा.** - प्लॉट नं. ६५, पद्माराजे हौसिंग सोसायटी, उजळाईवाडी, कोल्हापूर - ४१६ ००४.<br>२) **उज्वला प्रकाश खोपडे (जामिनदार),**<br>**रा.** - फ्लॅट नं. २०३, विश्वास अपार्टमेंट, न्यू शाहूपुरी, कोल्हापूर - ४१६ ००१.<br>३) **श्री. ऋषीकेश रघुनाथ विचारे (जामिनदार),**<br>**रा.** - मु. नडोदे, पोष्ट खालापूर, ता. खालापूर, जि. रायगड - ४१०२०२.<br>४) **विश्वराज दादासाहेब साळोखे (मयत) (जामिनदार)**<br>तर्फे कायदेशीर वारस - ४.अ)**श्रीमती शिल्पा विश्वराज साळोखे**<br>४.ब) **कु. पुष्कराज विश्वराज साळोखे**<br>४.क) **सौ. दिपीका मंदार चव्हाण**<br>**अनु.क्र. ४) ४.अ), ४.ब) व ४.क) रा.** - आर. एस. नं. २९, सुवर्णकुटी, अरुणोदय हौसिंग सोसायटी, शाहू पार्क, छत्रपती शिवाजी युनिर्व्हसिटी, कोल्हापूर. | **कर्ज खाते क्र.:**<br>**६०८/३३०१९४**<br>**रु. ७०,७३,८५७=०८**<br>(अक्षरी रुपये सत्तर लाख त्र्याहात्तर हजार आठशे सत्तावन्न आणि पैसे आठ फक्त)<br>**त्यावरील ता. ०१.१०.२०२५ पासूनचे व्याज व इतर खर्च.** |

## विक्री करावयाच्या मिळकतीचे वर्णन

मौजे उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथील पद्माराजे गृहनिर्माण संस्था मर्यादित, उजळाईवाडी मधील मिळकत याचा रि.स.नं. ३४अ/१, प्लॉट नं. ३ ( खुली जागा ) याचे क्षेत्र २७९.३० चौ.मी. ( ३००५.२७ चौ.फूट ) ही खुली जागा. **यांस चतु:सिमा पुढीलप्रमाणे - पूर्वेस** - प्लॉट नं. ४, **पश्चिमेस** - प्लॉट नं. २, **दक्षिणेस** - २० फुटी कॉलनी रस्ता, **उत्तरेस** - मोकळी जागा.

**(मिळकतीची राखीव किंमत रु. ५९,००,०००/- (रुपये एकोणसाठ लाख फक्त))**

## लिलावाच्या अटी व शर्ती

**१)** सदर मिळकत जास्तीत जास्त किंमत देणाऱ्यास विकली जाईल. तथापि, अधिकृत अधिकारी यांना कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारणेचा अगर नाकारणेचा अधिकार आहे. विक्री रद्द करणेचा / स्थगित ठेवणेचा अधिकार आहे, तसेच या शर्ती व अटी मध्ये कोणतेही कारण न देता बदल करणेचा अधिकार आहे. **२)** सदर मिळकतीसंबंधी विक्रीच्या इतर अटी व शर्ती बँकेच्या मुख्य कार्यालयात सुट्टीचा दिवस सोडून इतर कोणत्याही दिवशी पाहावयास मिळेल. **३)** इतर माहिती व टेंडर फॉर्म बँकेच्या मुख्य कार्यालयात सुट्टीचा दिवस सोडून इतर कोणत्याही दिवशी पहावयास मिळेल. **४)** टेंडर फॉर्मची किंमत रु. १,०००/- + जीएसटी (अपरतावा) राहील. इसारा रक्कम **रु. ५,९०,०००/- ( रुपये पाच लाख नव्वद हजार फक्त )** डिमांड ड्राफ्ट / पे ऑर्डर / ऑनलाईन स्ट्रान्सफर पद्धतीने निविदेसोबत देणे आवश्यक आहे. इसारा रक्कमेवर व्याज मिळणार नाही. सिलबंद निविदा **शुक्रवार, ता. १४/११/२०२५** पर्यंत बँकेच्या **मुख्य कार्यालयात** वर नमूद पत्त्यावर **अधिकृत अधिकारी** यांचेकडे देणेच्या आहेत. **५) डिमांड ड्राफ्ट / पे ऑर्डर** सिलबंद पाकीटामध्ये न देता **स्वतंत्रपणे देणेच्या आहेत**. चेक स्वीकारला जाणार नाही व ज्याने चेक दिला आहे त्यास लिलावामध्ये सहभागी होता येणार नाही. **६)** जर एकापेक्षा जास्त निविदा एकाच रकमेच्या आल्या तर त्या लिलावदारांमध्ये बोली लावणेत येईल व त्यातील सर्वाधिक बोली बोलणाऱ्यास लिलाव बहाल केला जाईल. **७)** अपसेट / राखीव किंमत बँकेद्वारे निश्चित केली आहे. सदर निश्चित केलेली राखीव किंमत ही हस्तांतरण शुल्क आणि मिळकतीसंबधी संलग्न इतर शुल्कांव्यतिरिक्त आहे. **८)** ज्या व्यक्तीची निविदा स्वीकारणेत येईल, त्यास त्याच दिवशी लिलाव रकमेच्या २५ टक्के रक्कम इसारा रक्कमेसह भरावी लागेल व उर्वरित रक्कम १५ दिवसांत भरावी लागेल अन्यथा लिलाव धारकांने भरलेली रक्कम जप्त केली जाऊन लिलाव नामंजूर होईल व सदर मिळकत पुन्हा लिलावास लावली जाईल व मिळकतीवर कोणताही अधिकार राहणार नाही. सदर रक्कम भरणा करण्याच्या कालावधीमध्ये मुदत वाढ देणेचा सर्वस्वी अधिकार अधिकृत अधिकारी यांना राहिल. **९)** ज्या व्यक्तीच्या नांवे लिलाव मंजूर होईल त्यास सर्वप्रकारच्या कायदेशीर पूर्तता झालेनंतर सदर मिळकतीचे सेल सर्टीफिकेट दिले जाईल व त्या प्रसंगी येणाऱ्या मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, इतर खर्च, मिळकतीचे सर्व कर व इतर कायदेशीर खर्च, शासकीय देणी व टी.डी.एस. रक्कम स्वतंत्र भरावे लागतील. खरेदीदाराने अशी सर्व रक्कम भरलेनंतर कायदेशीर बाबींची पुर्तता केलेनंतर त्यास मिळकतीचा ताबा दिला जाईल. **१०)** सदर मिळकत 'जशी आहेत तशी व आहे त्या परिस्थितीत' विक्री करणेत येईल. बँकेच्या अधिकृत अधिकारी यांना ज्ञात व अवगत माहितीप्रमाणे सदर मिळकतीवर कोणाचाही बोजा नाही. तथापि, या लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या बोलीदारांनी लिलावात काढलेल्या मिळकतीवरील बोजा संबंधी, मालकी हक्कासंबंधी तसेच त्यावरील हक्क, दावे, बाकी मिळकतीस बाधक असणाऱ्या गोष्टी संबंधी बोली बोलणेपुर्वी स्वतंत्रपणे व स्वत: माहिती घेणे आवश्यक आहे आणि सदर लिलाव प्रकरणामुळे बँकेने कोणत्याही प्रकारचे दायीत्व स्विकारले नाही अगर हे प्रगटन म्हणजे बँकेने कोणाचे प्रतिनिधीत्व केले असे समजणेत येऊ नये. सदर मिळकत ही बँकेस ज्ञात व अज्ञात असलेल्या माहितीप्रमाणे आणि त्यावर अस्तित्वात असलेल्या व भविष्यात होणाऱ्या बोजासह विकणेत आलेली असून अधिकृत अधिकारी हे त्रयस्थ पक्षकार यांनी केलेल्या कोणत्याही दाव्यास, मागणीस / बाकी यांस जबाबदार असणार नाहीत. **११)** राखीव किंमतीच्या खालील रक्कमेस टेंडर भरले असेल तर बोलीदाराची इसारा रक्कम जप्त केली जाईल व त्यास लिलावामध्ये सहभागी होता येणार नाही. **१२)** बोलीदाराने त्यांचे स्वप्रमाणित पासपोर्ट आकाराचा फोटो, रहिवासी पुरावा जसे आधार कार्ड, इ. कागदपत्रे के.वाय.सी. साठी सदर टेंडर अर्जासोबत जोडावीत व लिलावाच्या वेळी त्याची मूळ कागदपत्रे तपासणीसाठी आणावीत. **१३)** लिलाव प्रसंगी **कर्जदार व जामिनदार** यांना हजर राहता येईल.

**आरटीजीएस तपशील:-** खात्याचे नांव: **श्री महालक्ष्मी को-ऑप. बँक लि., कोल्हापूर**
**बँक व शाखा नांव - आयडीबीआय बँक, असेंब्ली रोड, कोल्हापूर.**
**RTGS तपशील : खाते क्र. - ११६१०२०००००५९६८; IFSC कोड - IBKL0000116**

**स्थळ : कोल्हापूर**
**तारीख:** २७/१०/२०२५

**अधिकृत अधिकारी,**
**श्री महालक्ष्मी को-ऑप. बँक लि., कोल्हापूर**

( इंग्रजी आणि मराठी नोटीसीच्या संदर्भात विसंगती अथवा तफावत असल्यास इंग्रजी नोटीस ग्राह्य धरण्यात येईल. )

8 cm. x 30 cm. = 240 sq.cm.
Pudhari_KOP - **28-10-2025**